Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## गट ब आणि क

संयुक्त परीक्षा (पूर्व + मुंख्य)

बुकलेट - 6

**मराठी आणि इंग्रजी**

SIERRA INNOVATIONS


# INDEX


| S. No. | Chapter Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | भाषा व संबंधित माहिती | 1 |
| 2. | वर्णविचार | 3 |
| 3. | संधी | 31 |
| 4. | शब्दविचार | 40 |
| 5. | नाम | 42 |
| 6. | सर्वनाम | 46 |
| 7. | विशेषण | 48 |
| 8. | क्रियापद | 50 |
| 9. | क्रियाविशेषण अव्यय | 54 |
| 10. | शब्दयोगी अव्यय | 58 |
| 11. | उभयान्वयी अव्यय | 61 |
| 12. | केवलप्रयोगी अव्यय | 64 |
| 13. | लिंग विचार | 66 |
| 14. | वचन विचार | 69 |
| 15. | काळ | 72 |
| 16. | सामान्य रुप | 76 |
| 17. | समास | 80 |
| 18. | शब्दसिद्धी | 86 |
| 19. | शब्दशक्ती | 104 |
| 20. | वाक्यविचार | 109 |
| 21. | वाक्यपृथक्करण | 115 |
| 22. | वाक्य रूपांतर | 119 |
| 23. | विरामचिन्हे | 121 |
| 24. | विभक्ती व कारकार्थ | 124 |
| 25. | प्रयोग | 126 |
| 26. | अलंकार | 130 |
| 27. | वृत्त | 137 |


| | | |
|---|---|---|
| 1. | The Alphabet & Word Types | 140 |
| 2. | The Sentence | 142 |
| 3. | Nouns | 144 |
| 4. | Pronouns | 147 |
| 5. | Verbs | 150 |
| 6. | Tenses | 153 |
| 7. | Subject-Verb Agreement | 156 |
| 8. | Adjectives and Adverbs | 159 |
| 9. | Prepositions | 162 |
| 10. | Conjunctions | 165 |
| 11. | Articles | 168 |
| 12. | Voices | 171 |
| 13. | Narration | 174 |
| 14. | Common Errors & Confusing Words | 177 |
| 15. | Practice Sets | 180 |
| 16. | Quick Revision | 182 |
| 17. | Vocabulary | 185 |
| 18. | Idioms and Phrases | 194 |
| 19. | Comprehension of Passages | 205 |

# प्रकरण 1 भाषा व संबंधित माहिती

- **भाषा** = भाष् – भाषय्ती म्हणजे जाणणे किंवा समजणे.
- **भाष्** या संस्कृत धातुपासून **भाषा** हा शब्द बनला आहे.
- **आपल्या मनातील भाव / विचार प्रकट करण्याचे अत्यंत प्रभावी साधन म्हणजे भाषा होय.**
- मानवी मुखातुन निघालेली **लयबद्ध ध्वनिसंहीता** म्हणजेच भाषा होय.
- भाषेत **बोलणे** महत्त्वाचे असते.
- भाषा म्हणजे फक्त बोलणेच नाही, तर त्यात **पशुपक्ष्यांचे आवाज, हातवारे, डोळ्यांचे इशारे, हावभाव, नैसर्गिक बोलणे,** तसेच सांकेतिक खुणा यांचाही समावेश होतो.
- **भाषेचे प्रकार खालीलप्रमाणे पडतात.**




## भाषेची वैशिष्ट्ये :






ToppersNotes / 9828-286-909 1

## प्राचीन कोरीव लेख : मराठीतील शिलालेख व ताम्रपट

मराठी साहित्यिकांनी **१९९०** च्या दशकापर्यंत मराठी साहित्याचा कळसच गाठला.

कर्नाटकातील **श्रवणबेळगोळ** येथील गोमटेश्वराच्या उंच मूर्तीच्या पायथ्याशी **इ.स.९८३,** मध्ये मराठीत कोरलेला लेख **'चावूण्डेराय करवियले' 'श्रीरंगराजे सुत्ताले करवियले'** हा मराठीतील पहिला पुरावा मानला जात होता. पण अलिकडेच **'गाथा सप्तशती'** हा दोन हजार वर्षापूर्वीचा आद्यग्रंथ सापडला आहे.

काही शिलालेख तज्ञांच्या मते, **२२२०** वर्षापूर्वीचा ब्राम्ही लिपीतील शिलालेख, की जो पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळच्या नानेघाटात असून त्यावर 'महारठिनो' ही अक्षरे कोरलेली आहेत, हा शिलालेख मराठीतील सर्वात प्राचीन शिलालेख मानला जातो.

मराठी भाषेच्या जन्मकाळचा शोध घेण्याचे प्रमुख साधन म्हणजे **ताम्रपट व शिलालेख** यांचे सशोधन होय. या शिलालेखांचा थोडक्यात **ठिकाण, शके, सन, निर्माता** असा तपशील खालीलप्रमाणे अभिजात भाषा समिती यांच्या अहवालातून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

| अ.क्र. | लेखाचे नाव | शिलालेख निर्माता/लेखक | ठिकाण | शके | इ.स. |
|---|---|---|---|---|---|
| १) | अक्षी शिलालेख | शिलाहार केशीदेव | अक्षी.जि.कुलाबा | ९३४ | १०१२ |
| २) | कुडल शिलालेख | – | कुडल.जि.सोलापूर | ९४० | १०१८ |
| ३) | दिवे आगार ताम्रपट | – | दिवे–आगर जि.रत्नागिरी | ९८२ | १०६० |
| ४) | चनई शिलालेख | महाकुमार सिंघनदेव | चनई जि.बीड | १००२ | १०८० |
| ५) | गोम्मट शिलालेख | चामुंडराज गंगराज | श्रवणबेळगोळ,जि.हसन कर्नाटक | १०३९ | १११७ |

Unleash the topper in you



ToppersNotes / 9828-286-909 2

# प्रकरण 2 वर्णविचार

- **वर्ण :– मुखाद्वारे निघणारा मूळध्वनी म्हणजे वर्ण.**
- वर्ण म्हणजे **रंग** (गव्हाळ वर्ण / गोरा वर्ण / ब्राम्हण वर्ण) पूर्वीच्याकाळी पाटी पेन्सिल, वही, पेन अस्तित्वात नसतांना तत्कालीन समाज **एकाच रंगाची** फुले/पाने तोडून त्यांना बारीक कुटून त्यापासून रस बनवायचा व त्या रसात काडी बुडवून **वेगवेगळ्या सांकेतिक** खुणा काढायचा, या सांकेतिक खुणा **वेगवेगळ्या रंगाच्या** असल्यामुळे त्या खुणांना वर्ण असे म्हणू लागले आणि म्हणून...
- **''मुखाद्वारे निघणारा मूळ ध्वनी म्हणजे वर्ण होय.''** तोंडाद्वारे उच्चारले जाणारे मूळध्वनी हवेत विरून जाऊ नयेत म्हणून ते विशिष्ट रंगाने लिहून ठेवले जातात म्हणून त्यांना वर्ण असे म्हणतात.

१) 'अ' पासुन 'ज्ञ' पर्यंतच्या मुळाक्षरांना वर्ण असे म्हणतात.(**दादोबा पांडुरंग तर्खडकर** –(मराठी भाषेचे पाणिनी)

२) मुखावाटे उच्चारल्या जाणाऱ्या मूलध्वनींना वर्ण असे म्हणतात. (**मोरो केशव दामले** – शास्त्रीय मराठी व्याकरण)

३) कंठ, तालू, इ. अवयवांपासून जे मूलध्वनी उत्पन्न होतात अशा मूलध्वनींना वर्ण असे म्हणतात.**(कृष्णशास्त्री चिपळुणकर)**

४) भाषेतील शब्दात असलेले मूलभूत ध्वनी (मूलध्वनी) म्हणजे वर्ण होय. **(महादेव पांडूरंग सबनीस)**

५) शब्द ज्या ध्वनींचे बनलेले असतात, त्या ध्वनींचे **अंत्यावयव** म्हणजे वर्ण होय. – **(अरविंद मंगरूळकर)**
**उदा.** घोडा–शब्द.

- घो, डा – ध्वनी/ध्वनीचिन्ह/अक्षरे. • घ् + ओ, ड् + आ–मूलध्वनी / वर्ण.
- **मूलध्वनी :–** ज्या ध्वनींचे अधिक विभाजन करता येत नाही अशा ध्वनींना मूलध्वनी असे म्हणतात.

| मूलध्वनी | ध्वनी | मूलध्वनी | ध्वनी | मूलध्वनी | ध्वनी |
|---|---|---|---|---|---|
| व् + अ | व. | क् + आ | का. | प + ई | पी. |


- **ध्वनी :–** मूलध्वनींच्या एकत्रीकरणातून ध्वनी तयार होतो. भाषा ही **ध्वन्यात्मक** असते; म्हणजे कोणतीही भाषा ध्वनींपासून बनलेली असते.
- ध्वनी हा भाषेतील **मुलभूत घटक** आहे.
- ध्वनीलाच **स्वन** असे म्हणतात.
- मराठी भाषा, ध्वनी → संस्कृत → प्राकृत → अपभ्रंश या परंपरेने बदलत आली; परंतु लिपी स्विकारतांना मात्र मराठीने संस्कृतची लिपी स्विकारली आहे.
- **प्राकृत ध्वनी :–** जुन्या मराठी भाषेतील ध्वनी म्हणजेच प्राकृत ध्वनी होय.
- **अपभ्रंश :–** शब्द संस्कृत मधून मराठीमध्ये येतांना शब्दांमध्ये झालेला बदल म्हणजे अपभ्रंश.
- **मूलध्वनी आणि वर्ण यांतील फरक :–**

| मूलध्वनी | वर्ण |
|---|---|
| १) मूलध्वनी **अमूर्त** स्वरूपाचे असतात | १) वर्ण **मूर्त** स्वरूपाचे असतात. |
| २) मूलध्वनी हे केवळ **उच्चारक्षम व श्राव्य** असतात. | २) वर्ण हे त्यांची **प्रतिके** असतात. |
| ३) मूलध्वनी हे जीवंत **प्रवाही** व श्राव्य असतात. | ३) वर्ण हे स्थिर कृत्रीम व **बद्ध** असतात. |
| ४) मूलध्वनी हवेत **विरतात** व नाहीसे होतात. | ४) मूलध्वनीचे **लिखीत रूप** म्हणजेच वर्ण होय. |

Unleash the topper in you



ToppersNotes / 9828-286-909 3




**वर्णांची उच्चारस्थाने (9)**

| उच्चारस्थाने | स्वर/स्वरादी | व्यंजने |
|---|---|---|
| कंठव्य (कं) | अ,आ,अः | क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् |
| तालव्य (ता) | इ, ई | च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श |
| मूर्धन्य (मू) | ऋ | ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, ऱ्, ष्, ळ् |
| दंतव्य (दं) | लृ | त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् |
| ओष्ठ्य (ओ) | उ, ऊ | प्, फ्, ब्, भ्, म् |
| कंठतालव्य | ए,ऐ,अॅ | - |
| दंतौष्ठ्य | – | व् |
| कंठौष्ठ्य | ओ,औ,ऑ | - |
| दंततालव्य | – | च्, छ्, ज्, झ् |


ToppersNotes / 9828-286-909 4

## वर्णमाला (मूळाक्षरे)

- अ पासून ळ पर्यंतच्या मूळाक्षरांना वर्णमाला असे म्हणतात.
- मराठी भाषेने जी वर्णमाला स्विकारली आहे ती **संस्कृत भाषेतील** आहे.
- मराठी वर्णमालेत **५०** वर्ण आहेत. ( अधिनियम :- ६/११/२००९ नुसार )
- पारंपारिक वर्णमाला **४८** वर्ण.
- आधुनिक वर्णमाला **५०** वर्ण.
- मिश्र वर्णमाला **५४** वर्ण. (५० + ४ = ५४) आधुनिक वर्णमाला (५०) + संयुक्त व्यंजने (४) (ज्ञ्, क्ष्, त्र्, श्र्).
- **स्वर (१४)** - अ आ इ ई उ ऊ ऋ लृ ए अ‍ॅ ऐ ओ ऑ औ.
- **स्वरादी (२)**- अनुस्वार **(अं)**, विसर्ग **(अः)**
- **व्यंजने (३४)** - **क्** ख् ग् घ् ङ् **च्** छ् ज् झ् ञ् **ट्** ठ् ड् ढ् ण् **त्** थ् द् ध् न् **प्** फ् ब् भ् म् **य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ**
- **मराठीतील विशेष संयुक्त व्यंजने (०४) :-**

  **क्ष्** = क् + ष्　　　　**त्र्** = त् + र्

  **ज्ञ्** = द् + न् + य् (मराठी)　　　　**श्र्** = श् + र्

  **ज्ञ्** = ज् +ञ् (संस्कृत)

  **ज्ञ्** = ग् + य् (हिंदी)
- क्ष्, ज्ञ् ही संयुक्त व्यंजने **म. पा. सबनीस** यांनी मराठी भाषेत आणली.
- अ‍ॅ, ऑ हे दोन नवीन स्वर इंग्रजी भाषेतून मराठीत आले आहेत. त्यांचा समावेश अरविंद मंगरूळकर यांनी मराठी वर्णमालेत केला आहे.
- वर्णाचे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

  १) स्वरूपानुसार- (३ प्रकार पडतात.)

  २) उच्चारानुसार- (९ प्रकार पडतात.)

### स्वरूपानुसार वर्ण

| स्वर | स्वरादी | व्यंजने |
|---|---|---|
| **(१४)** | **(२)** | **(३४)** |

- **स्वर /अच** स्वृ या संस्कृत धातुपासून स्वर हा शब्द बनला आहे.त्याचा अर्थ उच्चार करणे किंवा ध्वनी करणे असा होतो. **अच म्हणजे स्वतंत्र, जे वर्ण दुसऱ्या वर्णांवर अवलंबून नसतात, अशा वर्णांना अच असे म्हणतात.**
- ज्या ध्वनींचा उच्चार मुखातील कोणत्याही भागाला स्पर्श न होता होतो, त्या ध्वनींना स्वर असे म्हणतात.
- स्वर **स्वतंत्र उच्चाराचे** असतात. त्यांना उच्चारासाठी इतर कोणत्याही वर्णाची मदत घ्यावी लागत नाही.
- स्वर **पूर्ण उच्चाराचे** असतात; म्हणून त्यांचा समावेश अक्षरांमध्ये केला जातो.
- स्वर साधारणपणे **सघोष** असतात; म्हणून त्यांचा समावेश मृदु वर्णांमध्ये केला जातो.
- स्वरोच्चाराच्यावेळी हवेचा **मार्ग अडवलेला नसतो.**
- स्वरोच्चाराच्यावेळी तोंड विवृत्त (उघडे) असते.
- **मराठी भाषेत १४ स्वर आहेत.**　　: अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए , अ‍ॅ, ऐ , ओ, ऑ, औ.



ToppersNotes / 9828-286-909　　5

- स्वर भाषेत दोन प्रकारे वापरले जातात.
  १) **अक्षराच्या** स्वरूपात :- उदा. - आई
  २) **चिन्हांच्या** स्वरूपात :-
  उदाहरण. - काकी (ा, ी)
  क् + आ = का.
  क् + ई = की = काकी.

**स्वरांचे तीन वर्ग पडतात.**
- स्वरूप
- उच्चारस्थान
- व्युत्पत्ती

**स्वरांचे स्वरूपानुसार पोटप्रकार पडतात.**

| ऱ्हस्व स्वर | दीर्घ स्वर | संयुक्त स्वर | आदत्त स्वर |
|---|---|---|---|
| अ | आ | ए | ॲ |
| इ | ई | ऐ | ऑ |
| उ | ऊ | ओ | |
| ऋ | | औ. | |
| लृ | | | |

**अ) ऱ्हस्व स्वर** :- ज्या स्वरांचा उच्चार करण्यास **कमी कालावधी** / वेळ लागतो त्या स्वरास ऱ्हस्व स्वर असे म्हणतात. (२००९ च्या अधिनियमानुसार **६** ऱ्हस्व आहेत, अ, इ, उ, ऋ, लृ, ॲ.) ऱ्हस्व स्वराला **(U)** अर्धचंद्र असे चिन्ह देतात. व एक मात्रा मोजतात, ऱ्हस्व स्वराला **लघू** स्वर असेही म्हणतात.

**आ) दीर्घ स्वर :-** ज्या स्वरांचा उच्चार करण्यास **जास्त कालावधी** लागतो त्या स्वरास दीर्घ स्वर असे म्हणतात. (२००९ च्या अधिनियमानुसार **चार** दीर्घ स्वर आहेत, आ, ई, ऊ, ऑ.) दीर्घ स्वराला (-) **वजाबाकीच्या** चिन्हाने दर्शवितात, व दीर्घ स्वराच्या **दोन मात्रा** देतात. दीर्घ स्वराला **गुरू** स्वर असेही म्हणतात.

**इ) संयुक्त स्वर :-** ज्या स्वरांचा उच्चार करण्यासाठी (दोन मात्रा) एवढा वेळ लागतो; परंतु ते दोन किंवा अधिक स्वरांच्या **एकत्रीकरणातुन** बनलेले असतात म्हणून अशा स्वरांना **संयुक्त** स्वर असे म्हणतात.

- संयुक्त स्वरांची व्युत्पत्ती **मो. के. दामले** यांनी सांगितली आहे.
- संयुक्त स्वरांचा समावेश दीर्घ स्वरांमध्ये केला जातो.
- **ए** (अ + इ/ई), **ऐ** (आ + इ/ई), **ओ** (अ + उ/ऊ), **औ** (आ + उ/ऊ)

**ई) आदत्त स्वर :-** जे स्वर इंग्रजी भाषेने मराठी भाषेला दिलेले आहेत त्या स्वरांना आदत्त स्वर असे म्हणतात. **(ॲ, ऑ)**

**उच्चार स्थानानुसार स्वर**

| १) सजातीय स्वर (सवर्ण स्वर) | २) विजातीय स्वर (असवर्ण स्वर) |
|---|---|
| अ-आ | अ-इ, अ-उ, अ-ऋ, अ+लृ. |
| इ-ई | आ-इ, आ-ऊ, आ-ऋ, आ+लृ. |
| उ-ऊ | इ-उ, इ-ऋ, ई+अ, ई+लृ, ई+आ |
| लृ-लृ | उ-इ, उ-अ, उ-आ, उ+ऋ |
| ॲ-ॲ | ॲ-लृ, ऑ-लृ, इ-लृ, लृ-ऋ. |
| ऋ-ऋ | |

**टीप** :१) ॲ, ऑ हे स्वर बहूधा इंग्रजी शब्दांसाठीच वापरले जातात. २) ऋ, लृ हे स्वर काही तत्सम शब्दांमध्येच वापरले जातात.


ToppersNotes / 9828-286-909 6

१) **सजातीय स्वर / सवर्ण स्वर**

- ज्या दोन स्वरांचे उच्चारस्थान **समान** असते, सारखे असते, **एकच** असते अशा स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात.
- अ–आ, इ–ई, उ–ऊ. ऋ–ॠ, लृ–लृ, अॅ–अॅ, ऑ–ऑ.

२) **विजातीय स्वर / असवर्ण स्वर**

- ज्या दोन स्वरांचे उच्चारस्थान भिन्न असते, वेगळे असते. अशा स्वरांना विजातीय/असवर्ण स्वर असे म्हणतात.
- अ–इ, अ–उ, अ–ऋ, अ–लृ, आ–इ, आ–ऊ.......
- ए–ऐ, ओ–औ हे स्वर मूळातच विजातीय स्वरांपासून बनले असल्यामुळे त्यांचा समावेश सजातीय स्वरांमध्ये केला जात नाही.

**व्युत्पत्तीनुसार स्वर**

**१) मूळ स्वर / सिद्ध स्वर / स्वयंभू मूल (ऱ्हस्व)**

अ
इ
उ
ऋ
लृ
अॅ

**२) साधित स्वर**

| द्विगुणीत स्वर (दीर्घ) | तदुत्पन्न (संयुक्त) |
|---|---|
| अ + अ = **आ** | अ + इ/ई = **ए** |
| इ + इ = **ई** | आ + इ/ई = **ऐ** |
| उ + उ = **ऊ** | अ + उ/ऊ = **ओ** |
| अॅ + अॅ = **ऑ** | आ + उ/ऊ =**औ** |

१) **सिध्द स्वर / मूळ स्वर / स्वयंभू स्वर / मूलस्वर :–**

- जे स्वर मूळचे असतात इतर स्वरांपासून बनलेले नसतात. अशा स्वरांना सिध्द स्वर असे म्हणतात.
- सर्व ऱ्हस्व स्वरांचा समावेश सिद्ध स्वरांमध्ये होतो. अ, इ, उ, ऋ, लृ , अॅ.

२) **साधित स्वर. / तदुत्पन्न स्वर :–**

- जे स्वर सिध्द स्वरांपासून बनलेले असतात, अशा स्वरांना साधित स्वर असे म्हणतात.
- साधित स्वरांचे दोन प्रकार पडतात. : **अ) द्विगुणीत स्वर  ब) तदुत्पन्न स्वर.**
- एका सिध्द स्वरामध्ये तोच एक सिध्द स्वर मिसळून जो एक दीर्घ स्वर बनतो त्या स्वराला **द्विगुणीत स्वर** असे म्हणतात. द्विगुणीत स्वराला साधित स्वर असेही म्हणतात. उदा. अ + अ = **आ,** इ + इ = **ई,** उ + उ = **ऊ**
- दोन सजातीय स्वरांच्या एकत्रीकरणातून बनलेल्या स्वरांना **द्विगुणीत स्वर** असे म्हणतात.
  अॅ + अॅ = **ऑ,** अ + अ = **आ,** इ + इ = **ई,** उ + उ = **ऊ.**

३) **संयुक्त स्वर / तदुत्पन्न –**

- दोन विजातीय स्वरांच्या एकत्रीकरणातून बनलेल्या स्वरांना संयुक्त स्वर किंवा तदुत्पन्न स्वर असेही म्हणतात.
- अ + इ/ई = **ए,** आ + इ/ई = **ऐ,** अ + उ/ऊ = **ओ,** आ + उ/ऊ = **औ.**

४) **आद्य स्वर / अग्रस्वर –**

- ज्या स्वराचे उच्चारण होत असतांना जिभेचा **पुढचा भाग** टाळूच्या दिशेने वर उचलला जातो त्यास अग्रस्वर म्हणतात. **उदा. इ**
- **मध्य स्वर** – उच्चार होत असतांना जिभेचा **मधला भाग** टाळूच्या दिशेने वर उचलला जातो, त्यास मध्य स्वर म्हणतात. **उदा. अ.**
- **पश्च स्वर** – उच्चार होत असतांना जिभेचा **मागचा भाग** टाळूच्या दिशेने वर उचलला जातो, त्यास पश्च स्वर म्हणतात. **उदा. उ.**



**ToppersNotes / 9828-286-909** 7

- **वृत्ताकार स्वर –** ज्या स्वराचा उच्चार होत असतांना **तोंडाचा आकार गोल होतो** त्या स्वरास वृत्ताकार स्वर असे म्हणतात. **उदा. उ, ऊ**
- **अवृत्ताकार स्वर –** तोंडाचा आकार **गोल न होणारा** स्वर म्हणून  अवृत्ताकार स्वर होय. उदा. **आ.**
- **प्रमाणस्वर –** ज्या स्वरांच्या स्वरूपाबाबत **निश्चिती असते.** त्यांना प्रमाण मानून इतर कोणत्याही भाषेतील स्वरांचे मूल्यमापन करता येते. अशा स्वरांना प्रमाणस्वर असे म्हणतात.
- **प्रमाणस्वर आठ आहेत.  उदा.  अ, आ, इ, उ, अॅ, ऑ, ए, ओ.**
- **विवृत्त स्वर –** ज्या स्वरांचा  उच्चार होत असतांना **जिभ जेमतेम वर उचलली जाऊन,** जर **मुखविवर फार मोकळे** होत असेल तर अशा स्वरास विवृत्त स्वर म्हणतात. (विवृत्त म्हणजे मोकळे) **उदा. आ.**
- **अर्धविवृत्त स्वर–** जर मुखविवर **अर्धवट मोकळे राहत** असेल तर अशा उच्चारीत होणाऱ्या स्वरास अर्धविवृत्त स्वर म्हणतात. **उदा. अ.**
- **संवृत्त स्वर –** उच्चार होत असताना जिभेचा संबधित भाग फार उंच उचलला गेला तर मुखविवर **आकुंचित** होते, अशा स्वरास संवृत्त स्वर म्हणतात. **उदा. उ.**
- **अर्धसंवृत्त स्वर –** उच्चार होत असतांना मुखविवर **अर्धवट आकुंचित होत असते,** अशा स्वरास अर्धसंवृत्त स्वर म्हणतात. **उदा. ओ.**

## मराठीतील स्वरांची उच्चारपद्धती व चिन्हांची नावे

| अ.क्र. | स्वर | स्वरचिन्ह | चिन्हाचे नाव | उदाहरण | विग्रह |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | – | – | द | द् + अ |
| २ | अॅ | ॅ | अर्ध चंद्र | दॅ | द् + अॅ |
| ३ | आ | ा | काना | दा | द् + आ |
| ४ | ऑ | ॉ | अर्ध चंद्र व काना | दॉ | द् + ऑ |
| ५ | इ | ि | पहिली विलांटी / ऱ्हस्व इकार | दि | द् + इ |
| ६ | ई | ी | दीर्घ विलांटी / दीर्घ इकार | दी | द् + ई |
| ७ | उ | ु | ऱ्हस्व उकार / पहिला उकार | दु | द् + उ |
| ८ | ऊ | ू | दीर्घ उकार / दुसरा उकार | दू | द् + ऊ |
| ९ | ऋ | ृ | ऋकार | दृ | द् + ऋ |
| १० | लृ | लृ | लृकार | द्लृ | द् + लृ |
| ११ | ए | े | एक मात्रा | दे | द् + ए |
| १२ | ऐ | ै | दोन मात्रा | दै | द् + ऐ |
| १३ | ओ | ो | एक मात्रा व एक काना | दो | द् + ओ |
| १४ | औ | ौ | दोन मात्रा व एक काना | दौ | द् + औ |

- **मराठीतील स्वरांची उच्चारपध्दती –** एका वर्णाला एकच चिन्ह व एकच उच्चारस्थान आहे; पण त्यालाही काही अपवाद आहेत.
- **स्वरांचे उच्चार – मराठी काही शब्दातील अन्त्य अ हा अर्धवट/अपूर्ण उच्चारला जातो.**



**ToppersNotes / 9828-286-909** 8

**उदा.** जवळ **(ळ्)**, पान **(न्)**,राखण **(ण्)**,अटळ **(ळ्)**, परीट **(ट्)**, ओठ **(ठ्)**, कमळ **(ळ्)**, कपाट **(ट्)**, फुल **(ल्)**, मूल **(ल्)**, सून **(न्)**, वडील **(ल्)**, पोलीस **(स्)** बहीण **(ण्)** उंदीर **(र्)**

- **अर्धवट/अपूर्ण उच्चार याला निभृत उच्चार असेही म्हणतात.**
  **'अ' कारान्तखेरीज इतर शब्दांतील उपान्त्य अक्षर अ युक्त असेल तर ते अपूर्ण/तोकडे उच्चारले जाते.**
  **उदा.** आठवडा **(व्)**, पोचले **(च्)**, म्हटले **(ट्)**, सगळ्या **(ळ्)**, बोलणी (ल्).
- **अकारान्तापूर्वीचे स्वर मराठीत लांबट उच्चारले जातात. उदा.** गात, मोर, मेघ, विष, म्हैस, खण, मन.
- **अकारान्त तत्सम शब्दांत शेवटी येणाऱ्या अ चा उच्चार पूर्ण होतो. उदा.** मंदीर, तुप, सुर, विष, गृह इ.
- **काही संस्कृत शब्दांचा अन्त्य (शेवटचा) अ' चा उच्चार अपूर्णच असतो. उदा.** धन, लोभ, अक्षर, देव, वार, पुस्तक इ.
- **अनुस्वार, विसर्ग जोडाक्षरयुक्त अ कार शब्दाच्या शेवटी असेल; तर त्याचा उच्चार पूर्ण होतो.**
  **उदा.** अंत, रंग, दुःख, भिंत, संत, मंद, चिंच, गुच्छ, स्वच्छ, निःसंशय.
- **व, ग, ढ, या एक अक्षरी शब्दातील अ चा उच्चार थोडा लांबट होता.**
  **उदा.** अ) अनय **व** ओवी (ब) बेबी ला **ग** ची बाधा झाली (क) ही लता **ढ** आहे (ड) **व** ला काना.
- **चार अक्षरी शब्दांतील दुसऱ्या अक्षरातील अ हा अपूर्ण उच्चारला जातो.**
  **उदा.** खोबरेल **(खोब्रेल)**,सरकार **(सर्कार)**, करवत **(कर्वत)** रूखवत **(रूख्वत)**, लवकर **(लव्कर)**
- **संस्कृतमधून मराठीत जसेच्या तसे आलेल्या शब्दातील अन्त्य अ हा पूर्णोच्चारीत असतो.**
  **उदा.** गृह, पुत्र, वृक्ष, नृप, सुर, समर्थन, जल.
- **दीर्घान्तापूर्वीचे स्वर ऱ्हस्व उच्चारले जातात. उदा.** विळा, खेडी, पैसा, मासा.

## ब. मराठीतील प्रत्येक स्वरांचे ऱ्हस्व (आखूड) व दीर्घ (लांबट) असे उच्चार होतात.

उदाहरण :-

| स्वर | ऱ्हस्व उच्चार (कमी वेळ) | दीर्घ उच्चार (लांबट) |
|---|---|---|
| अ | **अ**डका, **अ**डवा | **अ**पाड, **अ**ट |
| आ | **आ**मचा, **मा**लकी, **आ**तडी | **आ**ड, **मा**ल, **आ**डव |
| इ | **इ**हलोक, **इ**भ (हत्ती) | **ई**श, **ई**ट |
| उ | **उ**साचा | **ऊ**स |
| ए | **ए**की, **ए**कला, **ए**कटा, **ए**कमुख | **ए**क |
| ऐ | **ऐ**कले, **ऐ**क, **ऐ**कुन, **ऐ**पत | **ऐ**क, **ऐ**ट |
| ओ | **ओ**ठात, **ओ**णव, **ओ**ढ | **ओ**ठ, **ओ**टा |
| औ | **औ**षध, **औ**क्षण | **औ**त, **औ**स |

**जेव्हा तुम्ही एखादे महान कार्य करण्यासाठी प्रेरित व्हाल, एखादे असामान्य काम करण्यासाठी आरूढ व्हाल, तेव्हा तुमचे विचार मर्यादेच्या पलीकडे जातील तुमच्या अंतर्मनाच्या कक्षा चाहुबाजुंनी रूंदावतील आणि तुम्ही स्वतःला एका वेगळ्या नवीन आणि चमत्कारी जगात पहाल तुमचे निद्रिस्त विचार आणि शक्ती जागृतावस्थेत पोहोचतील त्यावेळी तुम्ही स्वतःला स्वप्नातही पाहीले नसेल एवढे मोठे झालेले पहाल.**

Unleash the topper in you



ToppersNotes / 9828-286-909 9

## ऱ्हस्व स्वर व दीर्घ स्वर यांतील फरक

| अ.क्र. | ऱ्हस्व स्वर | अर्थ | दीर्घ स्वर | अर्थ |
|---|---|---|---|---|
| १ | **अरि** | शत्रु | **अरी** | टोचणे (शस्त्र) |
| २ | **आशिक** | आशीर्वाद | **आशीक** | प्रणयी, लुब्ध |
| ३ | **आळि** | धान्यातील कीड | **आळी** | गल्ली |
| ४ | **किंतु** | परंतु | **किंतू** | शंका |
| ५ | **खचित** | मढवलेला | **खचीत** | खरोखर |
| ६ | **गुरु** | शिक्षक | **गुरू** | जनावर |
| ७ | **चंचु** | चोच | **चंचू** | निष्णात |
| ८ | **चाटु** | संतोष देणारे | **चाटू** | स्वयंपाकातील लाकडी फळी |
| ९ | **चारु** | सुंदर | **चारू** | गवत, ग्रास |
| १० | **चिर** | दीर्घकाळापर्यत | **चीर** | भेग |
| ११ | **चिज** | वस्तु | **चीज** | संगीतातील गाण्याचे काव्य |
| १२ | **जित** | जिंकला गेलेला | **जीत** | जिंकलेला विजयी/जय |
| १३ | **टिका** | ठिपका | **टीका** | निंदा, भाष्य, समिक्षा |
| १४ | **दिन** | दिवस | **दीन** | गरीब |
| १५ | **दुर्** | दुष्टपणा | **दूर** | लांब, नंतर |
| १६ | **निज** | स्वतःचा | **नीज** | झोप |
| १७ | **निच** | नित्य | **नीच** | दुष्ट |
| १८ | **परिघ** | अडसर | **परीघ** | वर्तुळातील सीमारेषा |
| १९ | **पाणि** | हात | **पाणी** | जल |
| २० | **पुज्य** | शुन्य | **पूज्य** | आदरणीय |
| २१ | **पुर** | भरती | **पूर** | नगर |
| २२ | **पुत** | मुलगा | **पूत** | पवित्र |
| २३ | **पिक** | कोकीळा | **पीक** | धान्य |
| २४ | **प्रति** | कडे (प्रत्येकी) | **प्रती** | प्रत (झेरॉक्स) नग |
| २५ | **भरित** | भरलेला, पुष्ट | **भरीत** | वांग्याचे भरीत |
| २६ | **मिलन** | भेट | **मीलन** | मिटणे |
| २७ | **माणिक** | सोनार | **माणीक** | रत्न |
| २८ | **रवि** | सूर्य | **रवी** | दही घुसळण्याचे साधन |
| २९ | **रश्मि** | किरण | **रश्मी** | दोरी |
| ३० | **राजि** | समुदाय | **राजी** | मान्य |
| ३१ | **रुक्ष** | हुशार | **रूक्ष** | कठीण |
| ३२ | **रुपे** | एक धातु | **रूपे** | रूपाचे अनेक वचन |
| ३३ | **वारि** | पाणि | **वारी** | फेरी |
| ३४ | **विण** | शिवाय | **वीण** | जन्म |

Unleash the topper in you



ToppersNotes / 9828-286-909 10

# 1 प्रकरण

# The Alphabet & Word Types (वर्णमाला आणि शब्दप्रकार)

## इंग्रजी वर्णमाला (The English Alphabet)

- इंग्रजी भाषा **लॅटिन लिपी (Latin script)** मध्ये लिहिली जाते व त्यात **26 अक्षरे (26 letters)** आहेत. या अक्षरांपासून शब्द तयार होतात. ही अक्षरे दोन प्रकारची आहेत:
- **स्वर (Vowels): A, E, I, O, U**
- **व्यंजने (Consonants):** उर्वरित सर्व अक्षरे (B, C, D, F, G, H, J, K, L, M, N, P, Q, R, S, T, V, W, X, Y, Z)

## शब्दांचे प्रकार किंवा जाती (Parts of Speech)

- एखाद्या वाक्यातील शब्द कोणते काम करतो यावरून त्याला एक विशिष्ट वर्ग दिला जातो. या वर्गालाच **शब्दांचे प्रकार (Parts of Speech)** म्हणतात.
- इंग्रजी व्याकरणात मुख्यतः **आठ (8)** शब्दप्रकार आहेत. पुढील अध्यायांमध्ये या प्रत्येकाचा तपशीलवार अभ्यास करू. येथे आपण त्यांची ओळख करून घेऊ.

### 1. नाम (Noun)

- **व्याख्या (Definition):** एखाद्या **व्यक्ती, ठिकाण, वस्तू, गुणविशेष, क्रिया किंवा कल्पनेचे नाव** दर्शवणाऱ्या शब्दाला *नाम* असे म्हणतात.
- **उदाहरणे (Examples):**
  - **Person (व्यक्ती):** Rohan, teacher, woman
  - **Place (ठिकाण):** Mumbai, school, garden
  - **Thing (वस्तू):** book, water, phone
  - **Idea (कल्पना):** justice, happiness, time

### 2. सर्वनाम (Pronoun)

- **व्याख्या (Definition):** एखाद्या *नाम* ऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला *सर्वनाम* म्हणतात. नाम वारंवार वापरू नये यासाठी सर्वनामाचा उपयोग होतो.
- **उदाहरणे (Examples):** he, she, it, they, we, you, I (तो, ती, ते, ते/त्या, आपण, तू, मी)
  *Rohan* is a good boy. ***He*** plays football. (रोहन एक चांगला मुलगा आहे. ***तो*** फुटबॉल खेळतो.)

### 3. क्रियापद (Verb)

- **व्याख्या (Definition):** एखादी **क्रिया, घटना किंवा अवस्था** दर्शवणाऱ्या शब्दाला *क्रियापद* म्हणतात.
- **उदाहरणे (Examples):** eat, run, is, think, have (खाणे, धावणे, आहे, विचार करणे, असणे)
  The cat ***sleeps***. (मांजर ***झोपते***.)
  They ***are*** happy. (ते आनंदी ***आहेत***.)

### 4. विशेषण (Adjective)

- **व्याख्या(Definition):** एखाद्या *नाम* किंवा *सर्वनाम* ची **विशेषता** सांगणाऱ्या शब्दाला *विशेषण* म्हणतात. *विशेषण* कोणती, कशी, किती अशा प्रश्नांची उत्तरे देतात.
- **उदाहरणे (Examples):** good, tall, intelligent, five, blue (चांगले, उंच, हुशार, पाच, निळे)
  She has a ***red*** car. (तिच्याकडे एक ***लाल*** गाडी आहे.)
  He is **tall** (तो **उंच** आहे.)

### 5. क्रियाविशेषण (Adverb)

- **व्याख्या (Definition):** एखाद्या *क्रियापदा*ची, *विशेषणा*ची किंवा दुसऱ्या *क्रियाविशेषणा*ची **विशेषता** सांगणाऱ्या शब्दाला *क्रियाविशेषण* म्हणतात. **क्रियाविशेषण** हे कसे, केव्हा, कुठे, किती वेळा अशा प्रश्नांची उत्तरे देतात.

- **उदाहरणे (Examples):** quickly, very, here, always, well (जलद, खूप, इथे, नेहमी, चांगले)
  He runs ***quickly***. (तो ***जलद*** धावतो.)
  It is ***very*** sweet. (ते ***खूप*** गोड आहे.)

## 6. शब्दयोगी अव्यय (Preposition)

- **व्याख्या (Definition):** हे शब्द एखाद्या *नाम* किंवा *सर्वनाम* चा वाक्यातील दुसऱ्या शब्दांशी **संबंध** दाखवतात. शब्दयोगी अव्यय साधारणपणे स्थान, दिशा, काळ, कारण इत्यादी संबंध दर्शवतात.
- **उदाहरणे (Examples):** in, on, at, for, from, to (मध्ये, वर, कडे, साठी, पासून, पर्यंत)
  The book is ***on*** the table. (पुस्तक टेबल***वर*** आहे.)
  She comes ***from*** Pune. (ती पुणे***हून*** येते.)

## 7. उभयान्वयी अव्यय (Conjunction)

- **व्याख्या (Definition):** दोन शब्द, वाक्यप्रचार किंवा वाक्ये **जोडणाऱ्या** शब्दाला *उभयान्वयी अव्यय* म्हणतात.
- **उदाहरणे (Examples):** and, but, or, because, so (आणि, पण, किंवा, कारण, म्हणून)
  Tea ***and*** coffee. (चहा ***आणि*** कॉफी.)
  I like him ***because*** he is honest. (मला तो आवडतो ***कारण*** तो प्रामाणिक आहे.)

## 8. उद्‌गारवाचक अव्यय (Interjection)

- **व्याख्या (Definition): अचानक येणाऱ्या भावना** (आनंद, दुःख, आश्चर्य, कौतुक) दर्शविणाऱ्या शब्दाला *उद्‌गारवाचक अव्यय* म्हणतात. यानंतर सहसा विस्मयादिबोधक चिन्ह (!) येते.
- **उदाहरणे (Examples):** Wow!, Oh!, Alas!, Hurray! (व्वा!, अरेरे!, आहा!, होय!)
  ***Wow!*** What a goal. (***व्वा!*** काय गोल आहे.)

## Practice Exercises

**A) खालील वाक्यातील ठळक शब्द कोणत्या शब्दप्रकाराचे आहे ते लिहा. (Identify the Part of Speech of the underlined words.)**

1. **My** *father* **works** in a *big* **office.**
2. **Oh!** That snake is **very** *dangerous*.
3. She *danced* **beautifully and** won the competition.
4. They will go **to** the market **or** stay **at** home.

**B) रिकाम्या जागी योग्य शब्दप्रकार भरा. (Fill in the blanks with the correct Part of Speech.)**

1. A ________________ is a naming word.
2. A word that describes a noun is called an ________________
3. Words like *and*, *but*, *or* are ________________.
4. A word that shows an action is called a ________________

## Answers

**Exercise A:**

1. My (Possessive Pronoun), father (Noun), works (Verb), big (Adjective), office (Noun).
2. Oh! (Interjection), very (Adverb), dangerous (Adjective).
3. danced (Verb), beautifully (Adverb), and (Conjunction).
4. to (Preposition), or (Conjunction), at (Preposition).

**Exercise B:**

1. Noun
2. Adjective
3. Conjunctions
4. Verb

# 2 प्रकरण

# The Sentence (वाक्य)

**वाक्य म्हणजे काय? (What is a Sentence?)**

एक गट केलेले शब्द ज्यामध्ये एक **पूर्ण अर्थ (Complete meaning)** असतो व ज्यामुळे एक **पूर्ण विचार (Complete thought)** व्यक्त होतो, त्याला *वाक्य* म्हणतात. प्रत्येक वाक्याची सुरुवात **Capital Letter** ने होते व शेवट **विरामचिन्ह (Punctuation Mark)** जसे की पूर्णविराम (.), प्रश्नार्थक चिन्ह (?) किंवा उद्गारवाचक चिन्ह (!) ने होतो.

- **Example (वाक्य):** The students are reading their books. (विद्यार्थी त्यांची पुस्तके वाचत आहेत.)
- **Not a Sentence (वाक्य नाही):** Are reading their books. (कोण? काय वाचत आहे? हा विचार पूर्ण होत नाही.)

**वाक्याचे घटक (Parts of a Sentence)**

- प्रत्येक वाक्य मुख्यतः दोन भागांनी बनलेले असते:
  **कर्ता (Subject)** आणि **विधेय (Predicate).**
- **कर्ता (Subject):**
  - ✓ वाक्यातील **मुख्य व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा कल्पना** म्हणजे कर्ता होय. ते **काय करतो/काय आहे** याबद्दल माहिती दिली जाते. साधारणपणे कर्ता वाक्याच्या सुरुवातीला येतो.
  - ✓ कर्ता नेहमी **एक Noun** किंवा **Pronoun** असतो किंवा त्यात मुख्य Noun/Pronoun असतो.
- **विधेय (Predicate):**
  - ✓ वाक्यातील **कर्त्याबद्दल सांगितलेली माहिती** म्हणजे विधेय होय. हा भाग कर्त्यानंतर येतो आणि त्यात **क्रियापद (Verb)** असतेच.
  - ✓ विधेय केवळ Verb असू शकते किंवा Verb सोबत इतर शब्द (Object, Adverb, etc.) देखील असू शकतात.

✓ **उदाहरण सहित स्पष्टीकरण:**

| **वाक्य (Sentence)** | **कर्ता (Subject)** | **विधेय (Predicate)** |
|---|---|---|
| Birds fly. | Birds | fly. |
| पक्षी उडतात. | पक्षी | उडतात. |
| That dwarf man bought a tall car. | That dwarf man | bought a tall car |
| त्या बुटक्या माणसाने एक उंच गाडी आणली. | तो बुटका माणूस | एक उंच गाडी आणली. |
| She is a doctor. | She | is a doctor. |
| ती एक डॉक्टर आहे. | ती | एक डॉक्टर आहे. |

**वाक्यांचे प्रकार (Types of Sentences)**

अर्थ आणि उद्देश यावरून वाक्यांचे चार मुख्य प्रकार पडतात:

1. **विधानार्थी वाक्य (Declarative or Assertive Sentence)**
   - ✓ **उद्देश (Purpose):** एखादी **माहिती देणे** किंवा **विधान करणे**.
   - ✓ **रचना (Structure):** कर्ता + विधेय.
   - ✓ **विरामचिन्ह (Punctuation):** शेवटी **पूर्णविराम (.)** येतो.
   - ✓ **उदाहरणे (Examples):**

   The sun rises in the east. (सूर्य पूर्वेस उगवतो.)
   My name is Amit. (माझे नाव अमित आहे.)

2. **प्रश्नार्थक वाक्य (Interrogative Sentence)**

- **उद्देश (Purpose): प्रश्न विचारणे**.
  - ✓ **रचना (Structure):** सहसा Helping Verb (is, do, have, can, etc.) वाक्याच्या सुरुवातीला येते.
  - ✓ **विरामचिन्ह (Punctuation):** शेवटी **प्रश्नचिन्ह (?)** येतो.

- ✓ **उदाहरणे (Examples):**
  What is your name? (तुझे नाव काय आहे?)
  Do you like tea? (तुला चहा आवडतो का?)

**3. आज्ञार्थी वाक्य (Imperative Sentence)**

- ✓ **उद्देश (Purpose): आज्ञा देणे**, **विनंती करणे**, **सल्ला देणे** किंवा **उत्तेजन देणे**.
- ✓ **रचना (Structure):** या वाक्यात कर्ता [You] सहसा गृहीत धरलेला असतो आणि तो लिहिलेला नसतो. वाक्य थेट **Verb** ने सुरू होते.
- ✓ **विरामचिन्ह (Punctuation):** शेवटी पूर्णविराम (.) किंवा उद्गारवाचक चिन्ह (!) येते.
- ✓ **उदाहरणे (Examples):**

**Open** the door. (दार उघड.)
**Please help** me. (कृपया माझी मदत कर.)
**Be** kind to animals. (प्राण्यांशी दयाळू वाग.)

**4. उद्गारार्थी वाक्य (Exclamatory Sentence)**

- ✓ **उद्देश (Purpose): जोरात भावना व्यक्त करणे** (आनंद, दु:ख, आश्चर्य, क्रोध).
- ✓ **रचना (Structure):** सहसा 'What' or 'How' ने सुरू होते. वाक्यात भावनावाचक शब्द (Interjection) असू शकतात.
- ✓ **विरामचिन्ह (Punctuation):** शेवटी **उद्गारवाचक चिन्ह (!)** येतो.
- ✓ **उदाहरणे (Examples):**

**What a beautiful painting!** (किती सुंदर चित्र आहे!)
**How intelligent she is!** (ती किती हुशार आहे!)
**Wow! We won the match!** (व्वा! आम्ही सामना जिंकला!)

## Practice Exercises

**A) खालील वाक्यांतील कर्ता आणि विधेय ओळखा. (Identify the Subject and Predicate.)**

1. A brave firefighter saved the child.
2. The beautiful birds are singing sweetly.
3. My mother cooks delicious food.
4. They will go to Delhi tomorrow.

**B) खालील वाक्यांचे प्रकार ओळखा. (Identify the Type of Sentence.)**

1. Please turn off the lights.
2. How hot the day is!
3. The Earth revolves around the sun.
4. Where do you live?
5. Alas! We lost the game.

**C) खालील वाक्ये दिलेल्या प्रकारानुसार बदला. (Convert the sentences as per the given type.)**

1. It is a very sunny day. (Convert to Exclamatory)
2. Will you come with me? (Convert to Imperative - make it a request)
3. He is a very fast runner. (Convert to Exclamatory)
4. Bring me a glass of water. (Convert to Interrogative - start with 'Can you...')

## Answers

**Exercise A:**

1. S: A brave firefighter; P: saved the child.
2. S: The beautiful birds; P: are singing sweetly.
3. S: My mother; P: cooks delicious food.
4. S: They; P: will go to Delhi tomorrow.

**Exercise B:**

1. Imperative
2. Exclamatory
3. Declarative
4. Interrogative
5. Exclamatory

**Exercise C:**

1. What a very sunny day it is!
2. Please come with me.
3. What a fast runner he is!
4. Can you bring me a glass of water?

# 3 प्रकरण

# Nouns
# (नाम)

**नामाची व्याख्या (Definition of a Noun)**

**नाम (Noun)** हे एखाद्या **व्यक्ती (Person), ठिकाणाचे (Place), वस्तूचे (Thing), गुणविशेषाचे (Quality), क्रियेचे (Action)** किंवा **कल्पनेचे (Idea) नाव** दर्शविणारा शब्द आहे.

- **Examples (उदाहरणे):**
  - ✓ **Person:** student, woman, Amit, doctor (विद्यार्थी, स्त्री, अमित, डॉक्टर)
  - ✓ **Place:** city, Mumbai, school, garden (शहर, मुंबई, शाळा, बाग)
  - ✓ **Thing:** book, water, computer, money (पुस्तक, पाणी, संगणक, पैसा)
  - ✓ **Quality:** honesty, bravery, beauty (प्रामाणिकपणा, शौर्य, सुंदरता)
  - ✓ **Action:** laughter, movement, flight (हास्य, हालचाल, उड्डाण)
  - ✓ **Idea:** time, justice, happiness (वेळ, न्याय, आनंद)

**नामांचे प्रकार (Types of Nouns)**

- नामांचे मुख्यतः खालील 5 प्रकार पडतात.

**1. सामान्य नाम (Common Noun)**

- ✓ **व्याख्या:** एखाद्या **वर्गातील सर्वच व्यक्ती, ठिकाणे किंवा वस्तूंचा** सामान्यपणे उल्लेख करणाऱ्या नामाला *सामान्य नाम* म्हणतात. या नावांचे पहिले अक्षर capital लिहिण्याची आवश्यकता नसते. नाव वाक्याच्या सुरवातीला आल्यासच पहिले अक्षर capital लिहावे लागते.
- ✓ **Examples:** boy, city, river, month, language (मुलगा, शहर, नदी, महिना, भाषा)
- ✓ I am a **boy**. मी **मुलगा** आहे.

**2. व्यक्तिवाचक नाम (Proper Noun)**

- ✓ **व्याख्या:** एखाद्या **विशिष्ट व्यक्ती, ठिकाण, वस्तू किंवा संस्थेचे** अधिकृत नाव दर्शविणाऱ्या नामाला *व्यक्तिवाचक नाम* म्हणतात. या नावांचे पहिले अक्षर capital लिहितात.
- ✓ **Examples:** Sachin, India, the Ganga, January, Marathi (सचिन, भारत, गंगा, जानेवारी, मराठी)

My name is **Sachin** (माझे नाव **सचिन** आहे)

**3. समूहवाचक नाम (Collective Noun)**

- ✓ **व्याख्या:** एखाद्या **व्यक्तींचा, वस्तूंचा किंवा प्राण्यांच्या समूहाचे** एकवचनी नाव दर्शविणाऱ्या नामाला *समूहवाचक नाम* म्हणतात.
- ✓ **Examples:** team, army, fleet, committee, class (संघ, सैन्य, ताफा, समिती, वर्ग)

  Sachin's ***team*** is playing well. (सचिनचा **संघ** उत्तम खेळतोय. )

**4. भाववाचक नाम (Abstract Noun)**

- ✓ **व्याख्या:** एखादा **गुण, अवस्था, क्रिया, भावना किंवा कल्पना** यांसारख्या **पाहता न येणाऱ्या गोष्टीचे** नाव दर्शविणाऱ्या नामाला *भाववाचक नाम* म्हणतात.
- ✓ **Examples:** love, truth, freedom, childhood, wisdom (प्रेम, सत्य, स्वातंत्र्य, बालपण, शहाणपण)

Cricket is his favourite **childhood** game. (क्रिकेट हा त्याचा **बालपणीचा** आवडत खेळ आहे.)

**5. द्रव्यवाचक नाम (Material Noun)**

- ✓ **व्याख्या:** एखाद्या **पदार्थाचे** किंवा **सामग्रीचे** ना व दर्शविणाऱ्या नामाला *द्रव्यवाचक नाम* म्हणतात. हे सामान्यत: अगणनीय (Uncountable) असतात.

- ✓ **Examples:** gold, iron, water, wood, plastic (सोने, लोखंड, पाणी, लाकूड, प्लास्टिक) Cricket bat is made from the **wood**. (क्रिकेटची बॅट **लाकूड** पासून बनवली जाते.)

**<u>नामांची संख्या (Number of Nouns)</u>**

नाम एकवचनी (Singular) किंवा अनेकवचनी (Plural) असू शकतात.

1. **एकवचन (Singular):** एखाद्या एकाच व्यक्ती, वस्तू किंवा ठिकाणाचे नाव दर्शवते.
   - ✓ Example: book, child, man, box (पुस्तक, मूल, माणूस, पेटी)
2. **अनेकवचन (Plural):** एखाद्या एकापेक्षा जास्त व्यक्ती, वस्तू किंवा ठिकाणाचे नाव दर्शवते.
   - ✓ Example: books, children, men, boxes (पुस्तके, मुले, माणसे, पेट्या)

**<u>अनेकवचन बनवण्याचे नियम (Rules for forming Plurals):</u>**

| क्र | नियम (Rule) | एकवचन (Singular) | अनेकवचन (Plural) |
|---|---|---|---|
| 1. | बहुतेक नामांमागे **-s** जोडणे. | cat, pen, room | cats, pens, rooms |
| 2. | ch, sh, s, ss, x, o ने समाप्त होणाऱ्या नामांमागे **-es** जोडणे. | bus, box, dish, tomato | buses, boxes, dishes, tomatoes |
| 3. | **'consonant + y'** ने समाप्त होणाऱ्या नामांमध्ये **y** चे **i** होऊन **-es** जोडणे. | city, story, lady | cities, stories, ladies |
| 4. | **'vowel + y'** ने समाप्त होणाऱ्या नामांमागे फक्त **-s** जोडणे. | day, boy, key | days, boys, keys |
| 5. | **f** किंवा **fe** ने समाप्त होणाऱ्या नामांमध्ये **f/fe** चे **v** होऊन **-es** जोडणे. | leaf, wife, knife | leaves, wives, knives |
| 6. | **काही अनियमी नाम (Irregular Nouns)** | man, woman, child, foot, tooth | men, women, children, feet, teeth |
| 7. | **काही नामांचे एकवचन व अनेकवचन सारखेच असते.** | sheep, deer, fish, species | sheep, deer, fish, species |

**<u>नामांचे लिंग (Gender of Nouns)</u>**

इंग्रजीत नामांचे चार लिंग आहेत.

1. **पुल्लिंग (Masculine Gender):** पुरुष जाती दर्शवते.
   - ✓ Example: boy, man, king, father, actor (मुलगा, माणूस, राजा, वडील, अभिनेता)
2. **स्त्रीलिंग (Feminine Gender):** स्त्री जाती दर्शवते.
   - ✓ Example: girl, woman, queen, mother, actress (मुलगी, स्त्री, राणी, आई, अभिनेत्री)
3. **नपुंसकलिंग (Neuter Gender):** ज्या वस्तूंचे लिंग नसते, त्या.
   - ✓ Example: book, table, computer, city (पुस्तक, मेज, संगणक, शहर)
4. **सामान्यलिंग (Common Gender):** पुरुष किंवा स्त्री दोन्ही दर्शवू शकते.

- ✓ Example: student, child, parent, teacher, doctor (विद्यार्थी, मूल, पालक, शिक्षक, डॉक्टर)

## नामांचे कारक (Case of Nouns)

कारक म्हणजे वाक्यातील इतर शब्दांशी नामाचा असलेला संबंध. इंग्रजीत तीन मुख्य कारके आहेत.

1. **कर्ता कारक (Subjective Case):** वाक्यातील कर्ता जेव्हा क्रियापदाची क्रिया करतो.
   - ✓ **He** *writes* a letter. (**तो** एक पत्र *लिहितो.*)
2. **कर्म कारक (Objective Case):** ज्या नामावर क्रियेचा परिणाम होतो.
   - ✓ She helps **him**. (ती ***त्याला*** मदत करते.)
3. **संबंध कारक (Possessive Case):** एखाद्या नामाचा दुसऱ्या नामाशी संबंध दाखवते. अशी नामे Apostrophe ( **'** ) चा वापर करतात.
   - ✓ **Rule 1:** Singular noun (एकवचनी नाम) + **'s**: एकवचनी नामाच्या पुढे Apostrophe (') आणि 's' जोडला जातो. उदाहरण: Amit's book (अमितचे पुस्तक).
     अपवाद: जर एकवचनी नामाचा शेवट 's' ने होत असेल, तर काहीवेळा फक्त Apostrophe (') वापरला जातो. परंतु 's' आणि Apostrophe (') दोन्ही वापरणे योग्य मानले जाते. उदाहरण: James's shop (जेम्सचे दुकान) किंवा James' shop.
   - ✓ **Rule 2:** Plural noun ending with 's' (अनेकवचनी नामाचा शेवट 's' ने झाल्यास) + ': 's' ने संपणाऱ्या अनेकवचनी नामाच्या पुढे फक्त Apostrophe (') जोडला जातो. उदाहरण: boys' hostel (मुलांचे वसतिगृह).
   - ✓ **Rule3 :** Plural noun not ending with 's' (अनेकवचनी नामाचा शेवट 's' ने न झाल्यास) + **'s**: अनेकवचनी नामाच्या पुढे Apostrophe (') आणि 's' जोडला जातो. उदाहरण: children's park (मुलांचे उद्यान).

**Practice Exercises**

**A) खालील नामांचे प्रकार ओळखा. (Identify the type of noun.)**

1. Flock
2. Mumbai
3. bravery
4. teacher
5. silver

**B) खालील नामांचे अनेकवचन रूप लिहा. (Write the plural form of these nouns.)**

1. knife
2. toy
3. wife
4. sheep
5. photo

**C) खालील वाक्यातील नामांचे लिंग ओळखा. (Identify the gender of the nouns.)**

1. The **hero** of the movie is famous.
2. My **aunt** is a kind **woman**.
3. The **baby** is crying.
4. The **room** is very clean.

**D) खालील वाक्यांतील Possessive Case च्या चुका दुरुस्त करा. (Correct the errors in the Possessive Case.)**

1. This is Johns car.
2. The girls bags are in the room.
3. This is the childrens' playground.

**Answers**

**Exercise A:**

1. Collective Noun (समूहवाचक नाम)
2. Proper Noun (व्यक्तिवाचक नाम)
3. Abstract Noun (भाववाचक नाम)
4. Common Noun (सामान्य नाम)
5. Material Noun (द्रव्यवाचक नाम)

**Exercise B:**

1. knives
2. toys
3. wives
4. sheep
5. photos

**Exercise C:**

1. Masculine (पुल्लिंग)
2. Feminine (स्त्रीलिंग)
3. Common (सामान्यलिंग)
4. Neuter (नपुंसकलिंग)

**Exercise D:**

1. This is John's car.
2. The girls' bags are in the room.
3. This is the children's playground.